MHAU080013402024

**नियमित दिवाणी दावा क्र.८६/२०२४**
**(जुना : नियमित दिवाणी दावा क्र.१६४१/२०२२)**
**(मथुराबाई तुकाराम राऊत –विरुध्द– महाराष्ट्र शासन व इतर)**

**<u>निशाणी क्र.५ खालील आदेश</u>**

**१.** वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** वादीच्या अर्जाचे संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे :

वादींनी प्रतिवादींविरुध्द मौजे डिग्रस, ता. सिल्लोड येथील जमीन गट नं.११४ मधील क्षेत्र १ हे. ५८ आर पोटखराब क्षेत्र २ आर ज्याचे वर्णन दाव्यात नमुद केल्याप्रमाणे आहे (यापूढे सदर मिळकतीस 'वाद मिळकत' संबोधण्यात येते), याबाबत प्रतिवादी क्र.२ यांनी संचिका क्र.२०१९/आरओआर/सीआर–७९/२०१९ मध्ये जो दिनांक ०६.०७.२०१९ रोजी जो निर्णय दिला तो बेकायदेशीर, अन्यायकारक व वादींवर बंधनकारक नाही, याबाबत जाहीर ठराव व वाद मिळकतीत प्रतिवादींनी व त्यांच्या वतीने इतरांनी वादीच्या शांततामय ताब्यात हरकत व अडथळा करू नये म्हणून निरंतर ताकीदीची मागणी केलेली आहे.

**३.** वादी हे वाद मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. प्रतिवादी क्र.५ व ६ आणि त्यांची मुलं गंगाधर व विठ्ठल हे वादीच्या कायदेशीर वाद मिळकतीच्या ताब्यात हरकत व अडी–अडथळा दि.०६.०७.२०१९ रोजी जो आदेश मा. तहसीलदार सिल्लोड यांनी दिला त्या आधारे करत आहेत. त्यामुळे वादींना मशागत करणे त्रासदायक ठरत आहे आणि त्यामुळे वादींचे न भरुन येणार नुकसान होत आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी या दाव्याचा निकाल लागेपर्यंत दि.१७.०६.२०२२ रोजी जो

नि.दि.दावा क्र.१९/२०१७ मध्ये आदेश केला त्याची अंमलबजावणी करू नये.

**४.** पुढे वादींचे कथन की, वादींचा वाद मिळकतीवर ताबा आहे. प्रतिवादी क्र.५ व ६ हे बेकायदेशीर कृत्य करून वादींच्या वाद मिळकतीवर शांततामय ताब्यात हरकत व अडी–अडथळा करत आहेत. वादींनी प्रतिवादी क्र.५ व ६ यांना बेकायदेशीर कृत्य करु नका असे समाजवून सांगितले आणि त्यांच्या बेकायदेशीर कृतीविरुध्द प्रतिवादी क्र.५ व ६ आणि त्यांची मुलं प्रतिवादी क्र.७ व ८ यांच्या विरोधात तक्रारी दाखल केल्या. प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी वादींना पक्षकार न करता प्रतिवादी क्र.२ कडून आदेश मिळविला. त्यामुळे हा दावा दाखल करावा लागला. प्रतिवादी क्र.५ व ६ यांना वादींच्या वाद मिळकतीवरील शांततामय ताब्यात हरकत व अडी–अडथळा करण्याचा अधिकार नाही. वादींना प्रथमदर्शनी बाजु असून न्यायाचा झुकता तोल वादींच्या बाजूने आहे. शेवटी वादींनी प्रतिवादी क्र.२ ते ११ विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्याची विनंती केली.

**५.** प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी आपले लेखी म्हणणे व लेखी निवेदन ऑनलाईन स्वरुपात नि.क्र.१७ वर दाखल केले व वादींचे आरोप नाकारले. वादींचा दावा हा कायद्याच्या चौकटीन न बसणारा आहे. वादी स्वच्छ हाताने न्यायालयापुढे आलेले नाहीत. वादींनी रस्त्याबाबतची बाब मा. न्यायालयापासून लपवून ठेवली आहे. वाद मिळकत व वादींच्या क्षेत्राबाबत वाद नाही. तथाकथीत रस्ता हा पुर्वीपासून वापरात होता. कारण प्रतिवादी क्र.९ ते ११ यांच्या वडीलांनी सन २००८ मध्ये उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, सिल्लोड यांच्यामार्फत केलेल्या शासकीय मोजणीमध्ये सदर रस्ता उत्तर बाजूने अस्तीत्वात असल्याबाबत मोजणी नकाशामध्ये स्पष्टपणे नमुद केलेले आहे. जरी रस्त्याचा उल्लेख महसूल दप्तरी नसला तरी सदर रस्ता हा पूर्वीपासून अस्तीत्वात होता, परंतु वादी व इतर प्रतिवादी क्र.९ ते ११ यांनी सदर रस्त्यामध्ये अडथळा निर्माण करून जाणे–येण्यास अडथळा निर्माण केला होता.

वादींनी दिलेला अर्ज सन २०१७ मधील असून प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी दिलेला अर्ज सन २०१९ मधील आहे. त्यामुळे आलेल्या अर्जाच्या अनुषंगाने कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून प्रत्यक्ष घटनास्थळी पंचनामा करून न्यायनिर्णय पारीत केलेला आहे.

**६.** पुढे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे कथन की, प्रतिवादी क्र. ५ व ६ यांनी महसूल अधिनियमानुसार रस्त्यामधील अडथळा दुर करण्याच्या संदर्भात अर्ज प्राप्त झाल्यानंतर मा. तहसीलदार यांच्या आदेशानुसार मंडळ अधिकारी व तलाठी यांनी दि.२२.०६.२०१९ रोजी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पहाणी करून साक्षीदारांसमक्ष पंचनामा केला. घटनास्थळी प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर वादी व दाव्यातील प्रतिवादी क्र.९ ते ११ यांनी पूर्वीपासून अस्तीत्वात असलेला रस्ता अडविल्याचे निर्दशनास आले व तसा जबाब पंचांनी सांगितला. तसा अहवाल तहसीलदार साहेबांकडे वर्ग करून सुनावणी घेऊन उभयपक्षकार यांनी सुनावणीची संधी देऊन कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून प्रकरणातील दाखल कागदपत्रे व पुरावे यानुसार निर्णय पारीत केलेला आहे. मा. तहसीलदार यांचा दि.०६.०७.२०१९ रोजीचा आदेश हा नैसर्गिक न्यायतत्वाआधारे योग्य असून वादींना तो आदेश रद्द करून मागण्याचा कोणताही हक्क, अधिकार प्राप्त होत नाही, कारण मा. तहसीलदार यांनी पारीत केलेला हा दि.०६.०७.२०१९ रोजीचा असून वादींनी प्रस्तुत दावा हा ३ वर्षे विलंबाने दाखल केलेला आहे. वादींचा दावा हा मुदतबाह्य आहे. कायदेशीर तरतूदींनुसार तहसीलदार यांचे महसून अधिनियम कलम ५ प्रमाणे पारीत केलेल्या आदेशाविरुध्द मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे पूर्ननिरीक्षण अर्ज किंवा एक वर्षाच्या आत दिवाणी न्यायालयात वादी दाद मागू शकतात. शेवटी प्रतिवादींनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**७.** प्रतिवादी क्र.५ ते ११ यांना दाव्याचे समन्स लागूनही ते हजर झाले

नाहीत म्हणून त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला.

८. वादींच्या विधिज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्यातर्फे प्रस्तुत अर्जास त्यांना संधी देऊनही युक्तीवाद करण्यात आला नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज त्यांच्या युक्तीवादाशिवाय गूणवत्तेवर निकाली काढण्यासाठी पुढे चालविले.

९. वादी व प्रतिवादी यांचे कथनाच्या अनुषंगाने अर्ज निर्णीत करण्याकरीता खालील मुद्दे उपस्थीत झालेले असुन त्यांचे निष्कर्ष त्यापुढे खालील कारणांसह नमुद करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी यांनी तात्पुरता मनाई आदेश मिळण्यासाठी प्रथमदर्शनी केस निर्माण केली आहे काय ? | ...होकारार्थी. |
| २) | वादी यांचे बाजुने न्यायाचा समतोल आहे काय? | ...होकारार्थी. |
| ३) | जर तात्पुरत्या मनाई हुकुमाची मदत दिली नाही तर वादींचे अपरिमित नुकसान होईल काय? | ...होकारार्थी. |
| ४) | काय आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिता :**

**१०.** वादींनी अर्जाच्या पुष्ट्यर्थ वादी क्र.१ चे शपथपत्र सादर केले. वादींनी निशाणी क्र.४ समवेत जमीन गट क्र.११४ च्या ७/१२ उताऱ्याची छायांकीत प्रत, दि.२८.०६.२०१७ रोजीच्या अर्जाची छायांकीत प्रत, एन.सी. क्र.०४२०/२०१७ ची छायांकीत प्रत, दि.२७.०३.२०१८ रोजी मा. पोलीस अधीक्षक (ग्रामीण) यांना दिलेल्या तक्रारी अर्जाची छायांकीत प्रत, सिल्लोड न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारीची छायांकीत प्रत, एन.सी.क्र.०३८५/२०१८ ची छायांकीत प्रत,

दि.०५.०५.२०१९ चे समजपत्र, दि.१७.०५.२०१९ रोजी पोलीस अधीक्षक यांच्याकडे दिलेल्या तक्रारी अर्जाची प्रत, एन.सी. क्र.०२४६/२०१९ व ३३८/२०१९ ची छायांकीत प्रत, दि.०१.०७.२०१९ रोजीचा मा. तहसीलदार, सिल्लोड यांच्याकडे दिलेल्या तक्रारी अर्जाची प्रत, दि.२५.०७.२०१९ रोजी मा. तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे दिलेल्या तक्रारी अर्जाची प्रत, आर.सी.सी.क्र.७०/२०१८ मधील नि.क्र.१ ची छायांकीत प्रत, आर.सी.एस.क्र.२३०/२०१९ मधील नि.क्र.१ ची छायांकीत प्रत, एन.सी. क्र.३१५/२०२२ ची सत्यत, मा. तहसीलदार यांनी दि.०६.०६.२०१९ रोजी दिलेल्या निकालाची छायांकीत प्रत इत्यादी कागदपत्रे सादर केली.

**११.** वादींतर्फे विधीज्ञ श्री. विकास भाले यांनी अर्जातील कथनाप्रमाणे युक्तीवाद करताना सांगितले की, वादी हे वाद मिळकतीचे मालक व ताबेदार आहेत. वादींचे नाव ७/१२ अभिलेखात आहे. इतर अधिकारात रस्त्याचा उल्लेख नाही. वादी हा मा. तहसीलदार सिल्लोड यांच्याकडील कार्यवाहीत पक्षकार नाही. जर वादींच्या जमिनीतून तथाकथीत पायवाट / रस्ता झाला तर वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल.

**१२.** वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी हे मा. तहसिलदार यांनी दिलेल्या निर्णयाअधारे वादींची जमिन गट क्र.११४ मधून कथीत वादरस्ता / पायवाट करत आहेत, मा. तहसिलदार सिल्लोड यांनी दिलेला आदेश हा कादयाच्या तुरतुदीला अनूसरून नसून बेकायदेशीर आहे. त्यात न्यायनिर्णयाची अंमलबजावणी झाले तर वादींचे न भरुन येणारे नुकसान होईल व प्रतिवादी वादींच्या वादमिळकतीवरील कायेदशीर मालकी व शांततापुर्वक ताब्यात अडथळा करत आहेत व नविन असा गट क्र.११४ मधून तथाकथीत वादरस्ता करीत आहेत.

**१३.** या बाबतील उभयपक्षात दूमत नाही की, मा. तहसिलदार यांनी

दि.०६.०७.२०१९ रोजी मौजे डिग्रस, ता. सिल्लोड शिवारातील दक्षिण–उत्तर जाणारा, गट क्र.११४ मध्ये पुढे जाणारा रस्ता मोकळा करुन देणेबाबत आदेश केला आहे.

**१४.** तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्यासाठी वादींना त्यांची प्रथमदर्शनी बाजु आहे, जर मनाई हुकुमाची मदत दिली नाही तर वादींचे नुकसान होईल व न्यायाचा झुकता तोल वादींच्या बाजुने आहे इ. गोष्टी सिध्द केल्या पाहिजे. मनाई हुकुमाची मदत सम न्यायाच्या तत्वावर आधारित असते. आपण आता अंतरित अर्जाचा विचार करीत असल्याने प्रथमदर्शनी बाजु पहाणे गरजेचे आहे.

**१५.** या अर्जाच्या पुष्ट्यर्थ जो कागदोपत्री पुरावा दोन्ही बाजुंनी दाखल केला आहे तो पहाणे आवश्यक आहे. तो कागदोपत्री पुरावा वादींच्या अर्जातील कथनास सहाय्य करणे तितकेच आवश्यक आहे. मा. तहसिलदार, सिल्लोड यांनी दिलेला न्यायनिवाडा हा बेकायदेशीर आहे किंवा नाही तसेच वादींवर बंधनकारक आहे किंवा नाही हे दोन्ही बाजूंनी दिलेल्या पुराव्यावरून ठरेल. त्याबाबत जास्त उहापोह करण्याची या अर्जाकामी आवश्यकता नाही. मा. तहसीलदार सिल्लोड यांच्याकडील संचिका क्र.२०१९/आरओआर/सीआर–७९/२०१९ मधील दि.०६.०७.२०१९ रोजीच्या न्यायनिर्णयाची प्रत पाहता, त्या प्रकरणामध्ये प्रस्तुतचे वादी हे पक्षकार दिसून येत नाही. साहजिकच त्यांना झालेल्या दि.०६.०७.२०१९ रोजीच्या निकालाबाबत किंवा त्या कार्यवाहीबाबत माहीती नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तसेच त्या कार्यवाहीमध्ये गैरअर्जदारांनी त्यांचे म्हणणे अथवा पुरावे दाखल केले नसल्याचे त्या निकालपत्रामध्ये नमुद आहे. एकंदरीत, मा. तहसीलदार यांनी जाहीर केलेला निर्णय हा एकतर्फा झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. या न्यायनिर्णयामध्ये कुठेही वादींच्या क्षेत्राचा उल्लेख दिसून येत नाही. वादींनी जी ७/१२ उताऱ्याची सत्यप्रत दाखल केली त्यामध्ये प्रतिवादी क्र.७ ते ११, १५ व १६ यांच्या नावाचा उल्लेख दिसून येत नाही.

या ७/१२ उताऱ्यामध्ये वादी क्र.१ व २ आणि प्रतिवादी क्र.५, ६, १२ ते १५ यांची नावे दिसून येतात व त्यांचे क्षेत्रही दिसून येते. या ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्कामध्ये कुठेही रस्त्याचा किंवा जुन्या रस्त्याचा उल्लेख दिसून येत नाही. तसेच, वादींनी जो जुना ७/१२ उतारा दाखल केला त्याच्या इतर हक्कातही रस्त्याचा किंवा वाद रस्त्याचा उल्लेख दिसून येत नाही. मा. तहसीलदार यांच्या निर्णयाचे अवलोकन केले असता त्यांनी गट क्र.११४ मधील प्रतिवादी क्र.५, ६, १०, ११ व्यतिरिक्त इतर कब्जेदारांना किंवा लगतच्या कब्जेदारांना नोटीस काढल्याचे दिसून येत नाही. वादींनी दाव्यात वादरस्ता जो की तहसीलदार यांनी त्यांच्या दि.०६.०७.२०१९ रोजीच्या आदेशान्वये मोकळा करून दिला तो अस्तीत्वात असल्याबाबतचा महसूल दप्तरी कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल नाही. तो रस्ता अस्तीत्वात होता की नव्हता हे उभयपक्षांनी दिलेल्या पुराव्यावरून ठरेल. वाद मिळकतीची ७/१२ उताऱ्याची प्रत पाहता वाद मिळकतीवर वादींचा ताबा असल्याचे दिसून येते. वादींच्या क्षेत्रातून किंवा बांधावरून जर रस्ता होता व तो मोकळा करावयाचा असेल व रस्ता द्यायचा असेल तर तशी वादींना संचिका क्र.२०१९/आरओआर/सीआर–७९/२०१९ या प्रकरणात नोटीस देणे आवश्यक होते. ती दिल्याचे दिसून येत नाही. यासर्व गोष्टींचा व अभिलेखावरील अभिलेखांचा विचार करता वादींना प्रथमदर्शनी केस असल्याचे दिसून येत आहे. म्हणून, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'होकारार्थी' नोंदवित आहे.

**<u>मुद्दे क्र.२ व ३ करिता :</u>**

**१६.** वादींना प्रथमदर्शनी बाजू दिसून येत आहे. अभिलेखावर आलेल्या कागदोपत्री पुराव्यांचा विचार करता प्रतिवादी क्र.५ ते ११ हे वाद मिळकतीत हरकत व अडथळा करीत असल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी दि.०६.०७.२०१९ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी केली व त्या आदेशाआधारे प्रतिवादी क्र.५ ते ११ यांनी नवीन रस्ता तयार केला तर वादींचे न भरुन येणारे

नुकसान होईल. न्यायाचा झुकता तोल वादींच्या बाजूने असल्याचे दिसून येत आहे. म्हणून वादींना तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणे गरजेचे आहे. जर वादीस तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळाला नाही तर वादींचे अपरिमित नुकसान होईल. म्हणून, मी मुद्दे क्र.२ व ३ चे उत्तर मी 'होकारार्थी' नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करिता :</u>**

**१७.** वर उल्लेखीत केल्याप्रमाणे वादींना प्रथमदर्शनी बाजु दिसून येत असून न्यायाचा झुकता तोल वादींच्या बाजूने आहे. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता व मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष पाहता, मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज (नि.क्र.५) मंजूर करण्यात येतो.

२. दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.२ ते ११ यांनी वाद मिळकत (ज्याचे क्षेत्र दाव्यात नमुद केल्याप्रमाणे आहे) मध्ये बेकायदेशीररित्या हरकत व अडथळा करून नये अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात येते.

३. खर्च मुळ दाव्यात.

(आदेश खुल्या न्यायालयात सांगून टंकलिखीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUSHIL SHARADRAO DESHMUKH
Date: 2025.12.22 16:23:47 +0530

दिनांक : २२.१२.२०२५

(सु. श. देशमुख)
दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर),
सिल्लोड.